मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दिनांक १२ मार्च २०२४ । पान १

# भाजपाने ओबीसी समाजाला न्याय देण्याचे काम केले

## पिंपळे गुरव येथे ओबीसी सामाजिक संमेलन उत्साहात

**। पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

ओबीसी बांधवांसाठी केंद्र व राज्य शासनाने मोठा निधी दिला आहे. विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून बारा बलुतेदार बहुजन समाजाला पुढे आणण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. ओबीसी, पिंपरी चिंचवड, भारतीय जनता पार्टी आणि स्व. लक्ष्मणभाऊ यांचे एक अतूट नाते आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप पक्षाने जातीची तेढ न बांधता ओबीसी समाजाला न्याय दिला आहे.

नावे घेण्यासारखे असे अनेक नेते, कार्यकर्ते यांना ओबीसीमधून लाभाची पदे दिली. भाजपामध्ये खाली बसणा-यामधून आमदार होतो, कार्यकर्ता आमदार होतो, नवीन



निवडून आलेले आमदार हे मुख्यमंत्री झालेले आहेत. प्रथम राष्ट्र, मग पक्ष, नंतर स्वत: या घोषवाक्याप्रमाणे प्रत्येकाने संघटनात्मक कार्य करून मोदी सरकारच्या योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन भाजपा पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.

पिंपरी-चिंचवड शहर भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या वतीने रविवारी ओबीसी सामाजिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप बोलत होते.

पिंपळे गुरव येथे मोठ्या उत्साहात हे संमेलन पार पडले. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते, आमदार उमाताई खापरे, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष वीणा सोनवलकर, भटके-विमुक्त प्रदेश सरचिटणीस प्रमोद परदेशी, माजी महापौर माई ढोरे, अपर्णाताई डोके, स्थायी समिती माजी सभापती व ओबीसी मार्चा शहराध्यक्ष राजेंद्र राजापुरे, भाजपा शहर सरचिटणीस नामदेव ढाके, प्रवक्ते तथा उपाध्यक्ष राजू दुर्गे, पिंपरी विधानसभा प्रमुख अमित गोरखे, भाजपाचे प्रदेश सदस्य सदाशिव खाडे, ओबीसी मोर्चाचे सहसंपर्क प्रमुख मनोज ब्राह्मणकर, सरचिटणीस विनोद दळवी, गोरक्ष काळे, प्रदेश सदस्य गणेश वाळुंजकर, पुणे ग्रामीण उत्तर अध्यक्ष दत्तात्रय माळी, भाजपा ओबीसी मोर्चा सरचिटणीस दत्ता ढगे, खंडूदेव कठारे, अनिल राऊत, महिला ओबीसी संपर्कप्रमुख रोहिणी रासकर, भटके-विमुक्त आघाडी शहराध्यक्ष गणेश ढाकणे, सरचिटणीस सूर्यकांत गोफणे, सोनाताई गडदे, योगेश आकुलवार यासह संमेलनाला शहरातील ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रसंगी, ओबीसी मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांना पद नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले.

शंकर जगताप म्हणाले की, मावळ लोकसभा मतदार संघ भारतीय जनता पक्षाने लढावे, ही सर्व सामान्य कार्यकर्त्यांची इच्छा आहे. त्यासाठी आपल्याला बूथ स्तरावर ५१ टक्के मतदानासाठी मैदानात उतरावे लागणार आहे. अस असेल तरच केंद्र आणि प्रदेश स्तरावर मावळासाठी आपला कमळाचा विचार होणार आहे. त्यासाठी आपण सर्वांनी ५१ टक्क्यांची लढाई लढायची आहे. या कार्यासाठी पक्षासाठी आपण उभे राहिले तर पक्ष आपल्या पाठीशी उभा आहे.

# रस्त्यावरील बेवारस वाहने हटवा, पाणी पुरवठा सुरळीत करा

## जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण ५० तक्रारवजा सूचना मांडल्या

**। पिंपरी-चिंचवड।**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयांत करण्यात येते. सभेचे अध्यक्ष तथा मुख्य समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या महापालिका क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांना महापालिकेच्या अनुषंगाने असलेली कामे,



अडचणी, तक्रारी, सूचना या सर्व बाबींची नोंद घेऊन संबधितांना या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना महापालिकेकडून दिल्या गेल्या आहेत.महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयांमध्ये आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण ५० तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे १०, ३, १, ५, ४, ४, ११ आणि १२ तक्रारी वजा सूचना मांडल्या. अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सह शहर अभियंता मनोज सेठीया, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, उप आयुक्त अजय चारठाणकर यांनी भूषवले. तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, अण्णा बोदडे, डॉ. अंकुश जाधव, राजेश आगळे, सिताराम बहुरे, अजिंक्य येळे, उमेश ढाकणे उपस्थित होते.

आज झालेल्या जनसंवाद सभेत रस्त्यातील खड्डे बुजवताना उंचवटा तयार होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, मुख्य रस्त्यावरील खोल गेलेले चेंबर समतल करावेत, उद्यानात धुम्रपान तसेच अस्वच्छता करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, पिण्याच्या पाण्याची सोय नसलेल्या भागात जलवाहिन्या टाकण्यात याव्यात, पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, फुटलेल्या मलवाहिन्या लवकर दुरुस्त कराव्यात, शहरामध्ये विविध ठिकाणी स्थळदर्शक आणि मार्गदर्शक फलक लावावेत, शहरात सार्वजनिक शौचालयांची संख्या वाढविण्यात यावी,

# प्राधिकरणातील जमीन परताव्याचा प्रश्न ४० वर्षांनी मार्गी; महायुतीत श्रेयवादाची लढाई

## शेतकऱ्यांना ६.२५ टक्के प्रमाणे जमीन परतावा देण्यास मान्यता

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणासाठी जमीन दिलेल्या शेतकऱ्यांना ६.२५ टक्के प्रमाणे जमीन परतावा देण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यामुळे ४० वर्षे रखडलेला विषय मार्गी लागला. दरम्यान, शिवसेना खासदार श्रीरंग बारणे, भाजप आमदार महेश लांडगे, अश्विनी जगताप, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी स्वतंत्र प्रसिद्धीपत्रक काढत माहिती दिली. या निर्णयावरुन महायुतीच्या नेत्यांमधील श्रेयवादाची लढाई समोर आली. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकासासाठी सन १९७२ ते १९८३ या कालवाधीत अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत. १९७२ ते १९८३ आणि १९८४ नंतर दुसरा टप्पा संपादित झाला. १९८४ नंतरच्या बाधित शेतकऱ्यांना मोबादला मिळाला. पण, १९७२ ते १९८३ दरम्यान जमिनी संपादित झालेल्या १०६ बाधित शेतकऱ्यांना मोबादला मिळाला नव्हता. त्यांना परतावा देण्याचा विषय अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. त्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. प्राधिकरणामार्फत जमीन मालकांना परत करावयाची ६.२५ टक्के विकसित जमीन शक्य असल्यास ज्या गावातील जमीन संपादित केली असेल, तेथे देण्यात येईल. त्या गावात तेवढी जमीन उपलब्ध नसेल तर दुसऱ्या गावात उपलब्धतेनुसार वितरित करण्यात येणार आहे. सन १९७२ ते १९८३ या कालावधीत संपादित क्षेत्राच्या जमिनीचा मोबदला ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच घेतला आहे. त्यांना या निर्णयानुसार ६.२५ टक्के प्रमाणे जमीन परतावा करण्यापूर्वी त्यांनी तेवढ्या प्रमाणात जमीन मोबदला रक्कम सव्याज हे व्याजाची रक्कम जिल्हाधिकारी कार्यालय ठरवेल त्याप्रमाणे, ज्या तारखेपासून मोबदला घेतला असेल त्या तारखेपासून अशा ६.२५ टक्के जमिनीचा ताबा घेण्याच्या तारखेच्या मुदतीपर्यंत प्राधिकरणाला परत करावी लागणार आहे. जमिनीचा परतावा करताना भूखंडाकरिता मंजूर असलेला दोन चटई क्षेत्र निर्देशांक विनामूल्य मंजूर करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.ज्या शेतकऱ्यांना या निर्णयाचा फायदा घ्यायचा आहे. त्यांना न्यायालयात दाखल केलेल्या याचिका विनाशर्त मागे घेणे बंधनकारक राहणार आहे. प्राधिकरणाने जमीन मालकांना परत केलेली जमीन दुसऱ्या व्यक्तीस राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने, कोणत्याही प्रकारची रक्कम प्राधिकरणास न देता हस्तांतरित करता येईल. यासाठीचा प्रस्ताव प्राधिकरणाने छाननी करून अभिप्रायासह शासनास पूर्वमान्यतेसाठी सादर करावा लागणार आहे. भोसरीचे भाजप आमदार महेश लांडगे म्हणाले, की गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित प्राधिकरण बाधित १०६ शेतकरी कुटुंबांच्या प्रश्नासाठी २०१४ पासून आम्ही तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करीत होतो. शहराच्या राजकारणातील कळीचा मुद्दा ठरलेल्या प्राधिकरण बाधित शेतकऱ्यांना परतावा देण्याचा विषय आता कायमस्वरुपी निकालात निघाला. गेल्या ४० वर्षांपासून सुरू असलेल्या भूमिपुत्रांच्या संघर्षाला न्याय मिळाला.



# कचऱ्याच्या बायोमायनिंगमुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेस उपलब्ध होणार २५ एकर जागा

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मोशी कचरा डेपो येथील बायोमायनिंग प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्णत्वास आला आहे. सॅनिटरी लँडफिल १ येथे ८ लाख चौरस मीटर जुन्या कचऱ्याच्या बायोमायनिंगचे ७०% काम पूर्ण झाले आहे. आता दुसऱ्या टप्प्यामध्ये मोशी साईटवरील अतिरिक्त १५ लाख चौरस मीटर कचऱ्याचे बायोमायनिंग करण्यावर महापालिका लक्ष केंद्रित करणार असून नुकतेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या कामाचा शुभारंभ करण्यात आला आहे.पिंपरी चिंचवड शहरात दैनंदिन निर्माण होणारा कचरा पुर्वीपासुन मोशी येथील कचरा डेपोमध्ये प्रक्रिया करण्याकरिता पाठविण्यात येतो. बायोमायनिंग प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर, मोशी कचरा डेपोमध्ये २५ एकर जमीन मोकळी होणार आहे. या जमिनीचा वापर भविष्यातील घनकचरा व्यवस्थापन उपक्रम आणि नागरी विकास प्रकल्पांसाठी करण्यात येणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रात मोशी येथे सॅनिटरी लँडफिल १, २ व कॅपिंग केलेल्या एकुण २५ एकर जागेत २३ लाख चौरस मीटर (८ लाख + १५ लाख) इतका जुना डंपींग केलेला कचरा आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत जुन्या डंपिंग केलेल्या कचऱ्याचे बायोमायनिंग करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. जुन्या डंपिंग केलेल्या कचऱ्याचे शास्रोक्त पद्धतीने बायोमायनिंग करताना तयार होणारे आरडीएफ सिमेंट बांधकाम कंपन्यांना देण्यात येत असून जैव माती शेती आणि गार्डनिंगसाठी वापरण्यात येत आहे. उरलेला राडारोडा सखल भागात जमीन समपातळीत करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. या प्रकल्पाबाबत बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, बायोमायनिंगद्वारे पर्यावरण पुनरुज्जीवनाच्या दिशेने महापालिकेने महत्वपुर्ण पाऊल टाकले आहे.

बायोमायनिंगचे काम पुर्ण झाल्यानंतर जुन्या ३० वर्षातील साठलेल्या कचऱ्याचे शास्रोक्त पद्धतीने विघटन होणार आहे. बायोमायनिंगचे दुसऱ्या टप्प्याचे काम पुर्ण झाल्यास २५ एकर जागा घन कचरा व्यवस्थापनाच्या इतर प्रकल्पांकरीता उपलब्ध होणार आहे.

# उमेदवारी देणारे दिल्लीत 'मागणारे' झाले!

## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची अजित पवारांवर टीका

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
शिरूर लोकसभा मतदारसंघात महायुतीकडे उमेदवार नाही. महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये ही अस्वस्थता आहे. उमेदवारी देणारे दिल्लीत 'मागणारे' झाले आहेत. त्यांना दिल्लीच्या वाऱ्या कराव्या लागत आहेत, अशा शब्दात शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली. दरम्यान, शिरूर लोकसभा मतदारसंघाअंतर्गत येत असलेल्या हडपसर विधानसभा मतदारसंघात समन्वयासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हडपसर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक हडपसर येथील कन्यादान मंगल कार्यालयात सोमवारी झाली. त्यावेळी डॉ. अमोल कोल्हे यांनी अजित पवार यांच्यावर हल्लाबोल केला. हडपसर विधानसभा मतदारसंघातून कोल्हे यांना मताधिक्य देण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर, ठाकरे गटाचे माजी आमदार महादेव बाबर, काँग्रेसचे राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, काँग्रेस प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, ठाकरे गटाचे शहरप्रमुख संजय मोरे आणि जिल्हाप्रमुख विजय देशमुख यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होतेहडपसरच्या आमदाराला शिवसेनेने मदत केली. त्यामुळे ते निवडून आले. मात्र निवडून आल्यानंतर ते सर्व विसरले, अशी टीका ठाकरे गटाचे संजय मोरे यांनी केली.अर्थसंकल्प आणि महाविकास आघाडीमध्ये समन्वय साधण्याची जबाबदारी हडपसरच्या आमदारांची होती. मात्र त्यांनी भूमिका बदलली. त्यामुळे कार्यकर्ते नाराज झाले. मात्र समन्वयासाठी नव्याने समन्वय समिती स्थापन करण्यात येईल, असे प्रशांत जगताप यांनी जाहीर केले. लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमत मिळालेतर संविधान बदलले जाईल. त्यामुळे हा डाव यशस्वी होऊ देता कामा नये, असे अरविंद शिंदे यांनी सांगितले.शिरूर लोकसभा मतदारसंघात महायुतीकडे उमेदवार नाही. महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये ही अस्वस्थता आहे. उमेदवारी देणारे दिल्लीत 'मागणारे' झाले आहेत. त्यांना दिल्लीच्या वाऱ्या कराव्या लागत आहेत, अशा शब्दात शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली. अशा शब्दात शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली.



### आघाडीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित

» आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हडपसर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक हडपसर येथील कन्यादान मंगल कार्यालयात सोमवारी झाली. त्यावेळी डॉ. अमोल कोल्हे यांनी अजित पवार यांच्यावर हल्लाबोल केला. हडपसर विधानसभा मतदारसंघातून कोल्हे यांना मताधिक्य देण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर, ठाकरे गटाचे माजी आमदार महादेव बाबर, काँग्रेसचे राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, काँग्रेस प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, ठाकरे गटाचे शहरप्रमुख संजय मोरे आणि जिल्हाप्रमुख विजय देशमुख यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# शहरातील किती गतिरोधक मानांकनाप्रमाणे ?

## महापालिकेच्या सर्वेक्षणातील निष्कर्ष गुलदस्तात

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
शहरातील गतिरोधक अशास्त्रीय असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत निदर्शनास आल्यानंतर किती गतिरोधक मानांकनाप्रमाणे आणि शास्त्रीय पद्धतीने आहेत, याची माहिती महापालिकेने गुलदस्तात ठेवली आहे. त्यामुळे शहरातील गतिरोधक अशास्त्रीय पद्धतीचे आणि मानांकनाप्रमाणे नसल्याच्या आरोपांनाही पुष्टी मिळत आहे. महापालिकेच्या पथ विभागातील कनिष्ठ आणि वरिष्ठ अभियंत्यांनी पायी फिरत शहरातील गतिरोधकांचे सर्वेक्षण केले होते. त्यानंतर या संदर्भात सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी माहिती अधिकार दिनामध्ये शास्त्रीय पद्धतीचे गतिरोधक किती आहेत, याची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी त्यांनाही ही माहिती देण्यात आली नव्हती. त्यानंतर पथ विभागप्रमुख अनिरुद्ध पावसकर यांच्यासह अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला



त्याबाबतची माहिती देता आलेली नाही. त्यामुळे नक्की सर्वेक्षण कशाचे झाले, असा प्रश्न वेलणकर यांनी उपस्थित केला आहे. मानकांप्रमाणे असलेले गतिरोधक दाखवा आणि प्रति गतिरोधक १०० रुपये मिळवा, असे खुले आव्हानही वेलणकर यांनी एक महिन्यापूर्वी महापालिकेला दिले होते. मात्र मानांकनाप्रमाणे असलेल्या गतिरोधकांची माहितीच गुलदस्तात असल्याने त्यांनी केलेल्या आरोपालाही पुष्टी मिळत आहे. शहरातील किंवा ग्रामीण भागातील रस्ते तयार करताना इंडियन रोड काँग्रेसच्या नियमानुसार रस्ते, पदपथ, गतिरोधक तयार करण्यास प्राधान्य दिले जाते. त्यानुसार महापालिका प्रशासनाकडून महत्वाच्या, आवश्यक त्या ठिकाणीच गतिरोधकही तयार केले जातात. मात्र, शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरांमधील अंतर्गत भागांत प्रत्येक रस्त्यावर ठिकठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे गतिरोधक तयार केले आहेत. महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या ही बाब सर्वेक्षणावेळी निदर्शनास आली होती. महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनीही गतिरोधक धोरण आणि त्याची अंमलबजावणीची पद्धत निश्चित करण्यात आली असून, त्याप्रमाणे सर्व गतिरोधक शास्त्रीय पद्धतीने करण्यास सुरुवात करण्यात आल्याचे स्पष्ट केले होते. शहरातील गतिरोधक अशास्त्रीय असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत निदर्शनास आल्यानंतर किती गतिरोधक मानांकनाप्रमाणे आणि शास्त्रीय पद्धतीने आहेत.

# समाविष्ट ३४ गावांतील सोयी सुविधांसाठी १८ लोकप्रतिनिधींची समिती

## मार्च २०२२ मध्ये महापालिका सदस्यांची मुदत संपुष्टात आली



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या ३४ गावांतील मूलभूत सोयी सुविधांसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली १८ लोकप्रतिनिधींची समिती स्थापन करण्यास शासनाने सोमवारी मान्यता दिली. त्यामुळे समाविष्ट गावांतील विकास कामे या समितीच्या माध्यमातून केली जाणार आहेत. याबाबतचे आदेश नगर विकास विभागाचे उपसचिव प्रियांका कुलकर्णी यांनी प्रसृत केले. पुणे महापालिकेच्या हद्दीत सन २०१७ मध्ये ११, तर सन २०२१ मध्ये २३ अशी एकूण ३४ गावे राज्य सरकारकडून समाविष्ट करण्यात आली. गावे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर एक वर्षांनी म्हणजे मार्च २०२२ मध्ये महापालिका सदस्यांची मुदत संपुष्टात आली. त्यानंतर महापालिका निवडणुका होणे अपेक्षित होते. मात्र प्रभाग रचना आणि अन्य मुद्यांवरून वाद निर्माण झाल्याने महापालिका निवडणुका लांबणीवर पडल्या. परिणामी या गावांमधील विकास कामे मार्गी लावण्यासाठी लोकप्रतिनिधी नसल्यामुळे अनेक अडचणी येत आहे, असे कारण देत शिवसेनेचे शहर प्रमुख नाना भानगिरे यांनी मे २०२३ मध्ये या गावांमध्ये मूलभूत सोयी-सुविधांसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी, अशी मागणी पत्राद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली होती. ती मागणी मान्य करीत मुख्यमंत्र्यांनी तसे आदेश विभागीय आयुक्तांना दिले होते. त्यानुसार विभागीय आयुक्तांनी महापालिका आयुक्तांबरोबर बैठक घेऊन ३४ गावांसाठी ११ लोकप्रतिनिधींची समिती स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव ४ जुलै रोजी सरकारकडे सादर केला होता.

मात्र ११ ऐवजी १२ लोकप्रतिनिधींची नियुक्ती करावी, अशी मागणी भानगिरे यांनी १८ जुलै रोजी पुन्हा केली. मुख्यमंत्र्यांनी ती मान्य करीत फेरप्रस्ताव प्रस्ताव सादर करण्याचे आदेश विभागीय आयुक्तांना दिले. त्यावर विभागीय आयुक्तांनी ऑगस्ट २०२३ मध्ये महापालिका अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन १८ सदस्यांची समिती नेमण्याचा प्रस्ताव राज्य सरकारला सादर केला होता. अखेर आठ महिन्यांनी शासनाने ही समिती स्थापन करण्यास मान्यता मिळाली आहे.

### पत्राद्वारे मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**» पुणे महापालिकेच्या हद्दीत सन २०१७ मध्ये ११, तर सन २०२१ मध्ये २३ अशी एकूण ३४ गावे राज्य सरकारकडून समाविष्ट करण्यात आली.गावे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर एक वर्षांनी म्हणजे मार्च २०२२ मध्ये महापालिका सदस्यांची मुदत संपुष्टात आली. त्यानंतर महापालिका निवडणुका होणे अपेक्षित होते. मात्र प्रभाग रचना आणि अन्य मुद्यांवरून वाद निर्माण झाल्याने महापालिका निवडणुका लांबणीवर पडल्या. परिणामी या गावांमधील विकास कामे मार्गी लावण्यासाठी लोकप्रतिनिधी नसल्यामुळे अनेक अडचणी येत आहे, असे कारण देत शिवसेनेचे शहर प्रमुख नाना भानगिरे यांनी मे २०२३ मध्ये या गावांमध्ये मूलभूत सोयी-सुविधांसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी, अशी मागणी पत्राद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली होती.**

# थकबाकी वसूल करण्यास राज्य शासनाची स्थगिती

## अजित पवार यांना फायदा होण्याची शक्यता



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** समाविष्ट गावातील मिळकतकर थकबाकी वसुलीला राज्य शासनाने सोमवारी स्थगिती दिली. समाविष्ट गावांपैकी बहुतांश गावे शिरूर आणि बारामती लोकसभा मतदारसंघात येत असल्याने त्याचा अजित पवार यांना फायदा होण्याची शक्यता आहे. हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांना तीनपट मिळकतकर आकारणी महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून करण्यात आली आहे. तसेच थकबाकी वसुलीसाठी मोहीम ही हाती घेण्यात आली असून त्याविरोधात समाविष्ट गावातील नागरिकांकडून सातत्याने नाराजी व्यक्त होत होती. या पार्श्वभूमीवर गावक-यांनी गेल्या आठवड्यात उपमुख्यंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती. त्यावेळी धोरणात्मक निर्णय होत नाही तोपर्यंत थकबाकी वसुली करू नये अशी सूचना पवार यांनी आयुक्त प्रशासक विक्रम कुमार यांना केली होती.त्यानंतर रविवारी झालेल्या कार्यक्रमावेळीही पवार तसे स्पष्ट संकेत दिले होते. समाविष्ट ३४ गावातील मिळकतकर शास्तीकराचा प्रश्न पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर सोडविला जाईल. तोपर्यंत शास्तीकराची म्हणजे मिळकतकराच्या थकबाकीच्या दंडची आकारणी करण्यात येऊ नये, अशी सूचना महापालिकेला करण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय लवकरच घेतला जाईल, असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केले होते.त्यानुसार मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयचाराजकीय फायदा अजित पवार यांना होईल अशी चर्चा या निमित्ताने सुरू झाली आहे. दरम्यान या निर्णयाला ठाकरेगटाने विरोध दर्शविला असून सर्वांना समन्याय द्यावा अशी मागणी ठाकरे गटाचे शहर प्रमुख संजय मोरे यांनी केली आहे.समाविष्ट गावातील मिळकतकर थकबाकी वसुलीला राज्य शासनाने सोमवारी स्थगिती दिली. अजित पवार यांना फायदा होण्याची शक्यता आहे. महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांना तीनपट मिळकतकर आकारणी कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून करण्यात आली आहे.